नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे


वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३२१ | Issue - 321 | वार रविवार दि. १२ एप्रिल २०२६ | Blow- Sunday Date 12 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# परभणी आणि नांदेडमध्ये भूकंपाचे तीव्र हादरे

## मराठवाडा हादरला! पत्रे हलल्याने भीतीचे वातावरण; भांडीकुंडी कोसळली, घरांना तडे, सकाळी ८.३० च्या सुमारास घडला प्रकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नांदेड : विदर्भ आणि मराठवाड्याच्या सीमावर्ती भागात आज सकाळी ८:४६ च्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिम आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांमध्ये जमिनीखालील हालचालींमुळे नागरिकांमध्ये मोठी घबराट पसरली. काही ठिकाणी धक्क्यांची तीव्रता इतकी होती की घरांवरील पत्रे उडाले असून जुन्या घरांच्या भिंतींना तडे गेल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सकाळच्या वेळी अचानक आलेल्या या संकटामुळे नागरिक घरातून बाहेर पडले असून प्रशासनाकडून खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.



**भांडीकुंडी कोसळली, घरांना तडे**

हिंगोली जिल्ह्याला आज सकाळी ८:४७ च्या सुमारास भूकंपाच्या तीव्र धक्क्याने हादरवून सोडले. हिंगोलीत वारंवार जाणवणाऱ्या धक्क्यांच्या तुलनेत आजचा हादरा अत्यंत मोठा असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे. धक्क्याची तीव्रता इतकी होती की घराघरातील भांडी आणि जीवनावश्यक वस्तू जमिनीवर कोसळल्या, तर अनेक कच्च्या व पक्क्या घरांच्या भिंतींना मोठे तडे गेले आहेत. हिंगोलीसह शेजारील नांदेड आणि परभणी जिल्ह्यांतही हे हादरे जाणवले असून, सध्या संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण आहे.

**हिंगोलीत ४.७ रिश्टर स्केलचा मोठा भूकंप** - हिंगोली जिल्ह्याला आज सकाळी भूकंपाचा भीषण धक्का बसला असून, रिश्टर स्केलवर याची ४.७ इतकी तीव्रता नोंदवण्यात आली आहे. या भूकंपाचे केंद्रबिंदू पांगरा शिंदे हे गाव असून संपूर्ण जिल्ह्यातील गावांना याचे तीव्र हादरे जाणवले. धक्का बसताच भयभीत झालेले नागरिक तातडीने घराबाहेर मोकळ्या जागेत धावले. सुदैवाने, या घटनेत अद्याप कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. प्रशासन सध्या या भूकंपाचा सविस्तर आढावा घेत असून, नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**हिंगोलीतील 'पांगरा शिंदे' ठरले भूकंपाचे केंद्रबिंदू**

मराठवाडा आणि विदर्भाच्या सीमेवर आज सकाळी भूकंपाचा मोठा धक्का बसला असून, त्याचे केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे हे गाव असल्याचे समोर आले आहे. जमिनीच्या १० किमी खोलीवर हालचाली झाल्याने ४.७ रिश्टर स्केल तीव्रतेचा हा भूकंप नोंदवला गेला. या भूकंपाचे पडसाद शेजारील जिल्ह्यांतही उमटले. नांदेड शहरातील सिडको, वजीराबाद आणि तरोडा सांगावी भागात सकाळी ८:४५ च्या सुमारास धक्के जाणवले. तसेच, यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील शेबाळपिंपरी परिसरातही नागरिकांना भूकंपाचे सौम्य हादरे जाणवल्याने नागरिकांमध्ये भीती पसरली आहे.

# राज्यात तापमान वाढले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : दिवसेंदिवस राज्यात तापमानाचा पारा वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या तापमानाचा मोठ्या प्रमाणात त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. राज्यात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. अनेक ठिकाणी ४० ते ४२ अंश तापमानाची नोंद झाली आहे. कोणत्या जिल्ह्यात किती तापमानाची नोंद झाली याबाबतची माहिती पाहुयात.

राज्यात उष्णतेचा पारा चांगलाचा वाढल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे तापमानाची नोंद झाली आहे. तापमाना वाढल्यामुळं नागरिकांना त्रास होत आहे. वाढत्या तापमानामुळं रस्त्यांवर लोकांची गर्दी दिसत नसल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

**राज्यातील तापमानाची आकडेवारी**

अकोला - ४२ अमरावती - ४१.०२ वर्धा - ४०.५ यवतमाळ - ४०.२ नागपूर - ३९.४ चंद्रपूर - ३९.८ मुंबई (सांताक्रुज) - ३४.६ रत्नागिरी - ३० सोलापूर - ४१.४ अहिल्यानगर - ४०.१ सांगली - ४०.३ जळगाव - ४१ परभणी - ३९.४ नंदूरबार - ३९.७ नाशिक - ३८.८ पुणे - ३९ मालेगाव - ४१ संभाजीनगर - ३९.४

### अनेक ठिकाणी तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे

**कोकण आणि मराठवाड्यातील बहुतांशी भागात उष्णता वाढण्याची शक्यता**

राज्यातील बहुतांशी भागांमध्ये पावसाला पोषक असलेले वातावरण निवळले आहे. काही भागात आजही ढगाळ हवामान होते. त्याभागात उकाडा जाणवत आहे. तर राज्यातील अनेक भागात तापमानात वाढ दिसून येत आहे. आज लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात ढगाळ हवामानाचा अंदाज आहे. या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाचाही अंदाज देण्यात आला आहे. तर राज्याच्या इतर भागातील तापमानात काहीसे चढ उतार दिसून आले. राज्यातील तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवस राज्यात काही ठिकाणी अंशतः ढगाळ वातावरण राहून उकाडाही जाणवण्याची शक्यता आहे. इतर भागात मात्र तापमानात वाढ होऊन उन्हाचा चटकाही वाढण्याचा अंदाज आहे. कोकण आणि मराठवाड्यातील बहुतांशी भागात उष्णता वाढण्याची शक्यता आहे. आज राज्यातील सर्वाधिक तापमान अकोला येथे नोंदले गेले. अकोल्यात ४०.१ अंश सेल्सिअस तापमान होते. तर देशातील सर्वाधिक तापमान आंध्र प्रदेशातील कुर्नूल येथे ४१.०४ अंश सेल्सिअस नोंदले गेले. कोकण विभागासाठीही यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबईसह किनारपट्टी भागात उष्ण आणि दमट हवामान राहणार असून तापमान ३६ अंशांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. उकाड्यामुळे नागरिक त्रस्त होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, वाढत्या उष्णतेच्या काळात नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, असं आवाहन करण्यात येत आहे.

FPA India
Family Planning Association of India

**फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा**

**खालील पदे भरणे आहे**

| पदाचे नांव | पद | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| ए.एन.एम. (नर्स) | १ | महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल मान्यता प्राप्त कोर्स पास असावे |
| फिल्ड वर्कर | १ | कोणत्याही शाखेची पदवी |

**-कामाचे आकर्षण -**

- फक्त नर्स पदासाठी पी.एफ. व ग्रॅज्युईटी लागू.
- वर्षभरात ३३ पगारी रजा
- दिवसपाळीची डयुटी
- दर शनिवारी अर्धा दिवस डयुटी
- रविवारी सुट्टी

**टीप : स्वत:ची टू व्हीलर गाडी आवश्यक, संगणकाचे ज्ञान आवश्यक, एरियामध्ये काम करण्याची आवड, नर्ससाठी ऑपरेशन थिएटरमधील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.**

**मुलाखतीचा पत्ता**

**फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा**
परमेश्वर कोळी समाज मंदिर, दयानंद कॉलेज रोड, जोडभावी पेठ पोलीस ठाणेजवळ, भवानी पेठ, सोलापूर ४१३००२ फोन नं. २९९११२७, मो. नं. ९०११९०७००१
e-mail - solapur@fpaindia.org

**इच्छुकांनी आपले अर्ज व शैक्षणिक कागदपत्रे बुधवार दि. २२ एप्रिल २०२६ पर्यंत सकाळी १०.३० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत वरील पत्त्यावर आणून द्यावेत.**

**मुलाखत - सोमवार दि. २७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता**

**प्रा. डॉ. एन.बी.तेली**
चेअरपर्सन

**प्रा. डॉ. आयेशा रंगरेज**
व्हाईस चेअरपर्सन



# बार्टी – म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (BARTI)

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बार्टी – म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (BARTI) – हे नाव उच्चारलं की डोळ्यांसमोर उभं राहतं ते एक वैचारिक केंद्र, सामाजिक न्यायाची प्रयोगशाळा, आणि परिवर्तनाच्या चळवळीचं हृदय. पण आज या नावाम ागचं वास्तव पाहिलं, तर ते केवळ निराशाजनक नाही – ते संतापजनक, अस्वस्थ करणारे आणि प्रश्न विचारायला भाग पाडणारे आहे. कारण ज्या संस्थेने महाराष्ट्रातील वंचित समाजाला विचारांची, शिक्षणाची आणि संविधानिक जाणिवेची ताकद द्यायला हवी होती, ती संस्था आज स्वतःच विचारशून्यतेच्या गर्तेत अडकलेली दिसते आहे.

महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गाडगे महाराज – या महामानवांच्या जयंती तोंडावर आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक गावागावात, शहरातील प्रत्येक गल्लीबोळात, जयंती मंडळे मोठ्या उत्साहात कार्यक्रमांची तयारी करत आहेत. या कार्यक्रम ांमध्ये हजारो लोक उपस्थित रा- हतात. त्या लोकांपर्यंत विचार पोहोचवण्यासाठी, प्रबोधन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पुस्तकं, संविधान आणि उद्देशिका वाटप केल्या जातात.

आणि हीच ती वेळ असते, जेव्हा बार्टीसारख्या संस्थेची भूमिका अत्यंत निर्णायक ठरते. कारण समाजातील सर्वसामान्य लोक, जयंती मंडळे, कार्यकर्ते – हे सर्व बार्टीकडूनच साहित्य खरेदी करतात. बार्टी ही केवळ संस्था नाही, ती विचारांच्या पुरवठ्याची प्रमुख वाहिनी आहे.

पण इथेच सर्वात मोठा धक्का बसतो.

महामानवांचे साहित्य गायब – आणि व्यवस्थेची निर्लज्जता

बार्टीमध्ये जाऊन जर एखादा कार्यकर्ता विचारतो – महात्मा फ ुले यांची पुस्तकं आहेत का?

डॉ. आंबेडकरांचे मूळ लिखाण उपलब्ध आहे का?

गाडगे महाराजांचे विचार साहित्य मिळेल का?

तर उत्तर काय मिळतं?

उपलब्ध नाही.

ही केवळ एक कमतरता नाही. हा महामानवांच्या विचारांचा अपमान आहे.

ज्यांनी या देशाला विचार दिला, ज्यांनी संविधान दिलं, ज्यांनी समाजाला उभं केलं – त्यांच्या लिखाणालाच जर बार्टीमध्ये स्थान नसेल, तर ही संस्था नेमकी कोणासाठी उभी आहे?

स्वतःच्या अधिकाऱ्यांची पुस्तकं – आणि महामानवांचा बहिष्कार?

या परिस्थितीचा सर्वात संतापजनक भाग म्हणजे –

बार्टीमध्ये पुस्तकं आहेत पण ती कोणाची?

बार्टीतील अधिकाऱ्यांनी लिहलेली पुस्तकं मोठ्या प्रम ाणात उपलब्ध

इतर लेखकांची पुस्तकं विक्रीसाठी

आणि त्यावर ५०% पर्यंत खरेदी खर्च

पण प्रश्न असा आहे –

महामानवांनी स्वतः लिह- लेली आणि शासनाने प्रकाशित केलेली मूलभूत पुस्तकं कुठे आहेत?

ही केवळ विसंगती नाही, हा जाणीवपूर्वक केलेला वैचारिक अन्याय आहे.

जेव्हा संस्था:

स्वतःच्या अधिकाऱ्यांची पुस्तकं पुढे ढकलते

इतर लेखकांवर निधी खर्च करते

आणि महामानवांच्या साहित्याकडे दुर्लक्ष करते

तेव्हा ती संस्था केवळ दिशाहीन होत नाही,

ती आपल्या मूळ उद्दिष्टांशी विश्वासघात करते.

संविधानाची उद्देशिका – घोषणांमध्येच का?

आज शासन स्पष्ट सांगतं –

प्रत्येक घरात संविधानाची उद्देशिका पोहोचली पाहिजे.

संविधान अमृत महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रभर मोठ्या प्रमाणात उपक्रम राबवले जात आहेत. जिल्हाधिकारी आराखडे तयार करत आहेत. जयंती मंडळे स्वतःहून पुढाकार घेत आहेत.

पण बार्टीमध्येच –

एकही उद्देशिका उपलब्ध नाही.

ही गोष्ट केवळ खेदजनक नाही, ती अत्यंत लाजिरवाणी आहे.

संविधानाची उद्देशिका म्हणजे केवळ कागदाचा तुकडा नाही,

ती देशाच्या आत्म्याची ओळख आहे.

आणि तीच जर बार्टीमध्ये नसेल,

तर ही संस्था संविधानाच्या नावाने नेमकं काय करत आहे?

जयंतीचा उत्सव – की विचारांचा बाजार?

आज महाराष्ट्रात जयंती म्हणजे केवळ कार्यक्रम नाही,

तो एक वैचारिक उत्सव आहे.

लोक स्वतः पैसे खर्च करून:

पुस्तकं घेतात

संविधान वाटतात

उद्देशिका घराघरात पोहोचवतात

पण या सर्व प्रक्रियेत बार्टीची भूमिका काय असायला हवी होती?

केंद्रस्थानी.

पण वास्तव काय आहे?

बार्टी अनुपस्थित आहे.

ही अनुपस्थिती केवळ प्रशासनिक नाही,

ती वैचारिक पोकळीचं लक्षण आहे.

भोंगळ कारभार की वैचारिक षडयंत्र?

बार्टीमध्ये:

महामानवांचे साहित्य नाही

संविधान नाही

उद्देशिका नाही

पण:

इतर पुस्तकांचा साठा आहे

अधिकाऱ्यांची पुस्तकं आ- हेत

निधी खर्च होतो आहे

मग प्रश्न उभा राहतो –

ही केवळ चूक आहे का, की जाणीवपूर्वक केलेलं दुर्लक्ष?

जर ही चूक असेल, तर ती इतकी मोठी कशी?

आणि जर ती जाणीवपूर्वक असेल, तर ती अत्यंत धोकादायक आहे.

हा अपमान थांबवावा ला- गेल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलं होतं –

शिक्षण हेच शोषितांचे शस्त्र आहे.

पण बार्टीमध्येच जर हे शस्त्र उपलब्ध नसेल,

तर समाजाला काय मि ळणार?

हा अपमान आहे:

महामानवांचा

संविधानाचा

आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा

आता प्रश्न नाही – आंदोलनाची वेळ आहे

ही परिस्थिती बदलण्यासाठी:

बार्टीमध्ये तात्काळ महाम ानवांचे साहित्य उपलब्ध करावं

शासन प्रकाशित पुस्तकांचा साठा निर्माण करावा

संविधान व उद्देशिका मोठ्या प्रमाणात वितरित कराव्यात

आणि या भोंगळ कारभारासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी

हा लढा केवळ पुस्तकांसाठी नाही,

हा लढा आहे विचारांसाठी, ओळखींसाठी आणि अस्तित्वासाठी.

बार्टीला आरसा दाखवण्याची वेळ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (इठढख) ही संस्था जर आजही जागी झाली नाही,

तर उद्या तिचं अस्तित्व केवळ नावापुरतं उरेल.

कारण संस्था भिंतींनी नाही,

तर विचारांनी जिवंत राहतात.

आणि जिथे विचारच नाहीत,

तिथे संस्था नाही –

फक्त एक पोकळी उरते.

आता वेळ आली आहे –

ही पोकळी भरून काढण्याची नाही,

तर ती हादरवून टाकण्याची.

कारण हा लढा आहे –

महामानवांच्या विचारांचा, संविधानाच्या सन्मानाचा, आणि सामाजिक न्यायाच्या अस्तित्वा- चा.

**– पंचशीला लामसोगे कुंभारकर**
**राज्य संघटक**
**नॅशनल दलित मूव्हमेंट फॉर जस्टीस महाराष्ट्र**
**९३७३३६५३०९**



# निलम निकम: संघर्षाच्या राखेतून भरारी घेणारी 'न्यायदेवतेची' लेक!




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नशिबाने दिलेल्या जखमांपेक्षा, कष्टाने मिळवलेले यश मोठे असते, हे वाक्य मौजे सुकेणे (ता. निफाड) येथील निलम निकम यांनी सत्यात उतरवून दाखवले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) निकालात निलम यांची दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) पदी निवड झाली आहे. हा विजय केवळ एका पदाचा नसून, एका स्त्रीने नियतीशी दिलेल्या लढ्याचा आहे.

नियतीचा घाला आणि दुःखाचा डोंगर

निलम यांचा प्रवास अत्यंत खडतर राहिला आहे. २०१२ मध्ये त्यांचे लग्न झाले, सुखाचे स्वप्न डोळ्यांत होते. मात्र, अवघ्या १० महिन्यांतच त्यांच्या पतीचे निधन झाले आणि सुखाचा संसार पत्त्याच्या बंगल्यासारखा विखुरला गेला. ऐन तारुण्यात वैधव्याचे दुःख पदरी आले असताना साम ान्यतः कोणीही खचले असते, पण निलम यांनी रडत बसण्यापेक्षा लढण्याचा निर्णय घेतला.

पतीचे स्वप्न आणि शिक्षणाची जिद्द

आपल्या दिवंगत पतीच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी आणि स्वतःला सिद्ध करण्यासाठी त्यांनी कायद्याचे शिक्षण घेण्याचे ठरवले. घरची परिस्थिती आणि मानसिक दुःख सोबतीला असतानाही त्यांनी इङङइ चे शिक्षण जिद्दीने पूर्ण केले. निफाड न्यायालयात प्रॅक्टिस करत असताना त्यांनी केवळ वकिली केली नाही, तर कायद्याचा सूक्ष्म अभ्यासही केला. घरच्या जबाबदाऱ्या सांभाळून, सम ाजाचे टोमणे आणि संकटांवर मात करत त्यांनी अभ्यासात सातत्य ठेवले.

**मेहनतीला मिळालेले फळ**

न्यायाधीश होण्याचे स्वप्न उराशी बाळ- गून त्यांनी रात्रंदिवस मेहनत घेतली. अखेर त्यांच्या या तपाचे फळ त्यांना मिळाले असून, त्यांची न्यायाधीश पदी निवड झाली आहे. ज्या न्यायालयात त्यांनी वकिलीचे धडे गिरवले, आज तिथेच त्या न्यायाधीशाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

**यशाची त्रिसूत्री:**

प्रचंड आत्मविश्वास: पतीच्या निधनानंतर खचून न जाता स्वतःचे अस्तित्व निर्माण केले.

अखंड अभ्यास: प्रतिकूल परिस्थितीतही घरूनच कायद्याचे शिक्षण आणि स्पर्धा परी- क्षेचा अभ्यास केला.

कामाचा अनुभव: निफाड न्यायालयातील प्रत्यक्ष कामाच्या अनुभवाचा परीक्षेसाठी उपयोग करून घेतला.

**समाजासाठी एक आदर्श**

निलम निकम यांचे यश आजच्या तरुण पिढीसाठी, विशेषतः ग्रामीण भागा- तील महिलांसाठी दीपस्तंभासारखे आहे. परिस्थिती गरीब असली किंवा नशिबाने साथ दिली नाही तरी, कर्तृत्वाच्या जोरावर स्वतःचे नशीब स्वतः लिहिता येते, हे त्यांनी दाखवून दिले आहे.

मौजे सुकेणे गावच्या या 'संघर्ष कन्ये'चे आज सर्व स्तरांतून कौतुक होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस भरभरून शुभेच्छा!

# भारतीय जनता पार्टीच्या जिल्हाध्यक्षपदी प्रीतम सिंह देवकते पाटील यांची वर्णी लागावी, माळशिरस करांची इच्छा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतीय जनता पार्टीची सोल- ापूर जिल्हा ग्रामीण पश्चिम जिल्हा अध्यक्ष श्री चेतन सिंह केदार सावंत सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये सभापती पदाची धुरा सांभाळत असल्याने जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिलेला आहे. रिक्त झालेल्या भारतीय जनता पार्टीच्या जिल्हाध्यक्षपदी मल्हार सहकारी साखर कारखान्याचे संचालक प्रीतम से काशिनाथ देवकते पाटील यांची वर्णी लागावी, अशी माळशिरस करांची इच्छा आहे माळशिरस तालुक्यात प्रस्थापिता ंच्या विरोधामध्ये स्वर्गीय शिवाजीराव भाऊ पाटील, अँड सुभाष अण्णा पाटील यांच्या विच- ाराचा वसा व वारसा पुढे नेण्याकरिता प्रीतमसिंह देवकते पाटील यांना संधी द्यावी अशी मागणी होत आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये माळशिरस तालुका कायम राजकीय वर्तुळात चर्चेत राहिलेला तालुका आहे प्रस्थापितांच्या विरोधामध्ये स्वर्गीय शिवाजीराव पाटील भाऊंनी जनता दलाच्या जिल्हाध्यक्ष पदावर काम केलेले आहे. अँड सुभाष अण्णा पाटील यांनी भारतीय जनता पक्षाच्या जिल्हाध्यक्ष पदावर काम केलेले आहे. माळशिरस तालुक्याच्या राजकीय इतिहासामध्ये पाटील परिवाराचे मोठे योगदान आहे सांगोला, माळशिरस, माढा, करमाळा,

बार्शी, या तालुक्यांमध्ये धनगर समाजाचे जास्त मतदार आहेत याचाही फायदा भारतीय जनता पक्षाला होणार आहे प्रीतीचे देवकते पाटील परिवार यांच्या विचाराचा वसा व वारसा पुढे चालवत आहेत चांदापुरीच्या मालद- ानावर मल्हार सहकारी साखर कारखाना निर्मिती अंतिम टप्प्यात आलेली आहे ग्रामीण भागातील तरुणाच्या हा- ताला काम मिळणार आहे याचाही फायदा राजकारणात होऊ शकतो. जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडे भारतीय जनता पक्षाने सोलापूर जिल्ह्या- चे प्रभारी पदाची जबाबदारी दिलेली आहे त्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या रिक्त झालेल्या सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्हाध्यक्षपदी युवा नेतृत्व प्रीतम सिंह काशिनाथ देवकते पाटील यांना संधी द्यावी अशी माळशिरस करांची इच्छा आहे.

# महात्मा फुलेंची द्विशताब्दी जयंती माणकेश्वर वाचनालयात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : थोर समाज सुधारक, स्त्री शिक्षणाचे प्रणेते,महात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जयंती श्री म ाणकेश्वर वाचनालयात उत्साहात साजरी करण्यात आली.

वाचनालयाचे संचालक ग्रंथमित्र नईम खान पठाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून प्रतिमापूजन करण्यात आले. वाचनालयाचे चिटणीस प्रा. बाळासाहेब कापसे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला. हे वर्ष द्विशताब्दी वर्ष असल्यामुळे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्यावर विविध कार्यक्रम घेणार असल्याचा मनोदय वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांनी व्यक्त केला. याप्रसंगी वाचनालयाचे हिशोब तपासणीस दत्ता काका उगावकर, माजी संचालक अशोक पग- ारे यांच्यासह ग्रंथपाल नितीन बनसोडे, नंदकुमार पुंड आदी उपस्थित होते




## डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित शांतता कमेटीच्या बैठकीत आय पी एस अधिकारी मेघना यांचे प्रतिपादन

# नळदुर्ग शहरातील दारू बार बंद, चोरून विकणाऱ्यावर कडक कारवाई होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनस- ोडे : नळदुर्ग येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या निमित्ताने शांतता कमि टीची बैठक घेण्यात आली.

बैठकी मध्ये विविध विषयावर ते चर्चा करण्यात आली यामध्ये प्रामुख्याने नळदुर्ग शहरातील दारू देशी दारू ,आणि रोडवरील बार हे बंद करण्याचे आदेश आय पी एस अधिकारी मेघना यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना दिले आ- हेत.

दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात येईल यामध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे शिवाय नळदुर्ग शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकी संदर्भात मार्ग पाहण्यात आला भीमनगर , किल्ला गेट , नळदुर्ग पोलीस ठाणे , क्रांती चौक , ऐतिहासिक चावडी चौक , जय भवानी चौक , शास्त्री चौक , अहिल्यादेवी होळकर चौक , नवी पेठ , डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौक , बुद्धनगर , डॉ आंबेडकर नगर मार्गे बुद्ध विह- ारा समोर विसर्जन करण्यात येणार असल्याचे कमिटीतील सदस्यांनी सांगितले यामध्ये डॉल्बी सिस्टम यावरती प्रकाश टाकला असून डॉल्बी सिस्टम हे परवाना नसल्याचे आय पी एस मेघना अधिकारी यांनी नमूद केले.

यावेळी लेझीम पथक शुभेच्छा दारू झांज पथक टिपरी संघ शोभेची दारू आदी सह पथका सह २६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी चार वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पुजन होईल त्यानंतर मिरवणुकीला सुरुवात होईल परंतू दि २६ एप्रील मिरवणुकी रोजी सकाळपासून मी रात्री मिरवणूक संपेपर्यंत नळदुर्ग शहरातील दारू देशी दारू , बार चक्क बंद राहतील जेणेकरून जयंती मध्ये कुठल्याही प्रकारचा आडथाळा निर्माण होणार नाही चोरून मद्य विक्री करणाऱ्या दारू देशी दारू बार मालकावर कडक कारवाई होणार आसल्याचे मत आ पी एस अधिकारी मेघना यांनी केल्या आहेत यावेळी नळदुर्ग नगरीचे नगरसेवक तथा गटनेते मारुती खारवे बौध्दाचार्य तथा पत्रकार दादासाहेब बनसोडे , माजी नगरसेवक किशोर बनस- ोडे , जयंती कमिटीचे प्रमुख सुरज कांबळे, अभियंता अजयकुमार बागडे, राजेश बनसोडे, पत्रकार एस के गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते दिलीप भांगे, सिद्धार्थ सुरवसे, अमोल कांबळे, प्रशांत कांबळे, भैया कांबळे, अमर बनसोडे, राजरत्न बनसोडे, अतुल बनसोडे, प्रकाश बनसोडे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी होत असताना कसल्याही प्रकारचा अनुचित प्रकार होऊ नये म्हणून सर्व भीमसैनिकाने पोलीस प्रशास- नाला सहकार्य करण्याचे यावेळी आयपीएस अधिकारी मेघना यांनी सांगितले



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद प्रशाला (माध्यमिक) मुलांची एकत्र करण्याचा शासन निर्णय रद्द करावा

## शालेय व्यवस्थापन समितीसह पालकांची रास्ता रोको आंदोलन करून मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : नळदुर्ग ता. तुळजापूर येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद प्रशाला (माध्यमिक) तांत्रिक कारण दाखवून शासनाने दोन्ही शाळा एकत्र करण्याचा निर्णय घेतल्याचे समजते सदर निर्णय हा चुकीचा असून मुलांच्या बुद्धिमत्तेवर परिणाम होऊन शैक्षणिक नुकसान करणार आहे तरी हा निर्णय शासनाने त्वरित रद्द करावा व जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद प्रशाला (माध्यमिक) पुर्ववत स्वतंत्र ठेवाव्यात अशी मागणी शालेय व्यवस्थापन समिती जि.प.केंद्रिय प्राथमिक शाळा नळदुर्ग सह पालक वर्गातून येथील राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करून करण्यात



आली आहे.

सर्वसामान्य गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण मोफत व शक्तीचे करून प्राथमिक शाळा व माध्यमिक प्रशाला गावोगावी ठिकठिकाणी जिल्हा परिषदेच्या म ाध्यमातून शासनाच्या शिक्षण विभागाने गेल्या अनेक वर्षापासून सुरू केलेल्या आहेत. त्यामुळे गोरगरिबांच्या कुटुंबातील मुला मुलींना शिक्षणाची सोय झालेली आहे. नळदुर्ग येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा ही मुल्यांकनामध्ये अत्यंत गुणवत्ता संपन्न असून मुलांच्या शिक्षणाचा पाया या ठिकाणी भर भक्कमपणे भरला जात आहे.त्यामुळे या शाळेतून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना उच्च प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी कसलीच अडचण निर्माण होत नाही.जर केंद्रीय प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद माध्यमिक प्रशाला एकत्र केल्या तर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या बुद्ध्यांकावर परिणाम होऊन त्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे. सर्व काही व्यवस्थित असताना शासनाने विनाकारण या दोन्ही शाळा एकत्र करण्याचा जो निर्णय घेतला आहे तो चुकीचा असून तो निर्णय शासनाच्या शिक्षण विभागाने त्वरित मागे घेऊन गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळावे अशी मागणी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा शिवसेना (उबाठा) चे नळदुर्ग शहर प्रमुख संतोष पुदाले सह पालकांनी राष्ट्रीय महामार्गावर नळदुर्ग बस स्थानकासमोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात रास्ता रोको आंदोलन करून केली आहे.

या प्रसंगी जिल्हा परिषद प्राथमि क शाळेचे केंद्र प्रमुख सत्यश्वर जाधव म्हणाले की पालकांच्या भावना लक्षात घेऊन शासनाकडे योग्य तो



पाठपुरावा केला जाईल.

सदर निवेदन हे महसूल विभागाचे प्रतिनिधी म्हणून मंडळधिकारी डी.एम. काबळे यांनी स्वीकारले आहे.

या वेळी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक भास्कर मस्के सह पालक, कार्यकर्ते,शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते.

---

# ग्रामपंचायत पाडळीकडून विद्यालयास साऊंड सिस्टिम भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पाडळी ग्राम पंचायत नेहमीच शाळेच्या विकासा साठी पुढे असते शाळेच्या विविध प्रकारची बक्षीसे भौतिक सुविधा यात ग्रामपंचायत चा सहभाग असतो असे बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे सेक्रेटरी व विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक एस बी देशमुख यांनी गैरव उदगार काढले .

पाडळी ग्रामपंचायत, पाडळी च्या वतीने पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयास साऊंड सिस्टिम भेट देण्यात आली.असुन या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे उपाध्यक्ष टी.एस. ढोली हे होते यांनी विद्यार्थ्यांच्या भौतिक सुविधांसाठी ग्रामपंचायत पाडळी नेहमीच सहकार्य करत असते पुढेही असेच सहकार्य करत रहावे असे सांगितले. बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे सहसचिव अरुण भाऊ गरगटे यांनीही या ग्रामपंचायत पाडळीतील सर्वांचे आभार मानले व असाच मदतीचा हात पुढेही ठेवावा असे सांगितले. यावेळी पाडळी गावच्या सरपंच सौ. सुरेखाताई रेवगडे यांनी आपल्या ग्रामपंचायत निधीतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्हाला जे काही करता येईल ते आम्ही करण्याचा प्रयत्न करू असे सांगितले. शालेय समितीचे चेअरमन चंद्रभान रेवगडे, शालेय समिती सदस्य धनंजय रेवगडे,अनिल शिंदे गणेश रेवगडे, गणेश शिंदे, केशव रेवगडे, प्रवीण शिंदे ग्रामसेवक, ज्योती विन्नर मुख्याध्यापक बोगीरवाडी,संजय रेवगडे, तुकाराम पाटोळे,विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. व्ही. निकम यांनी प्रस्ताविक केले. सूत्रसंचालन सौ सविता देशमुख यांनी केले तर आभार संस्थेचे कोषाध्यक्ष व विद्यालयाचे सहशिक्षक टी.के. रेवगडे यांनी मानले. विद्यालयातील




शिक्षक आर. टी. गिरी, एम. एम. शेख, सी. बी. शिंदे, के.डी. गांगुर्डे, एस.डी पाटोळे, आर.एस. ढोली,ए .बी. थोरे, उपस्थित होते.

सूत्रसंचालन एस. एस. देशमुख यांनी केले तर आभार संस्थेचे कोषाध्यक्ष व विद्यालयाचे सहशिक्षक टी.के. रेवगडे यांनी मानले.

# महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आरोग्य शिबीर राबवा : विकीबाबा चौधरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्रामध्ये प्रत्येक तालुक्याम ध्ये आरोग्य शिबीर चे नियोजन जयंतीच्या निमित्ताने कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो सर्वसामान्य आपली जनता दवाखान्याच्या संदर्भात खूप अडचणीत आहे आपण या जयंतीच्या निमित्ताने संकल्प करूया की आपण जास्तीत जास्त आपल्या समाजातील लोकांना आरोग्याच्या संदर्भात मदत करावी या विचाराने हा शिबिर आपण आयोजित करूया ज्या ज्या तालुक्यांमध्ये जिल्ह्यामध्ये आरोग्य शिबिर घ्यायचे आहेत अशांनी मला थोडंसं संपर्क करा जेणेकरून जास्तीत जास्त ३५८ तालुक्यांमध्ये आपण नियोजन करूया संपूर्ण आरोग्य शिबिर च्या संदर्भात मदत आपण करूया महामानव बाबासाहेब आंबेडकरांनी कायम सर्वसामान्य झोपडीतल्या माणसाला मदत केली आणि या महाम ानवांची जयंती आहे आपण आपल्यातला प्रत्येक माणसाला आरोग्याच्या संदर्भात जेवढ्या काही अडचणी आहेत किंवा येणाऱ्या काही अडचणी आहेत किंवा सध्याच्या अडचण येत संपूर्ण मदत आरोग्य शिबिर च्या माध्यमातून आपण करूया जास्तीत जास्त महाराष्ट्रातील तमाम भीमसैनिकांनी मला संपर्क कराल अशी अपेक्षा जय भीम - ९९ २३ २३ २३ ५४.

---

# जि.प. सदस्य दुर्गुडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय शैक्षणिक साहित्य वाटप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तसेच हॅट्रिक जिल्हा परिषद सदस्य म हेंद्र काका दुर्गुडे यांच्या वाढदिवसानिमित्त तुळजा-पूर तालुक्यातील पिंपळा बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष व कार्याध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते व महेंद्र दुर्गुडे यांचे निकटवर्ती असलेली पांडुरंग मेहत्रे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी शालेय साहित्य व खाऊजी वाटप करण्यात आले यावेळी पांडुरंग मेत्रे यांनी उपस्थितांना महेंद्र काका दुरगुडे यांच्या कार्याविषयी माहिती दिली.

ह्यावेळी पंचायत समिती सदस्यता शिवसेना ठाकरे गटाची तालुकाप्रमुख श्री जगन्नाथ गवळी, जिल्हा कार्याध्यक्ष पांडुरंग मेहेत्रे, सरपंच सुधाकर वाघमोडे उपसरपंच विजय जाधव माजी सरपंच बालाजी खराबे शालेय शिक्षण व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बालाजी चुंगी किसान पडगळे रामदास चौगुले तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री कोळी सर, श्रीमती कोकाटे मॅडम, श्रीमती कुंभार मॅडम, व गावातील नागरिक उपस्थित होते यावेळी सूत्रसंचालन मुख्याध्यापक कोळी सर यांनी केली तर आभार कोकाटे मॅडम यांनी मानले,

# राष्ट्रविरोधी शक्तींना डॉ. आंबेडकरांच्या नावाचा वापर करू न देणे ही सामूहिक जबाबदारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : प्रतिनिधी : भार-तरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका समजून घेण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रविरोधी शक्तींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा वापर करू न देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते ॲड. क्षितिज गायकवाड यांनी केले. श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्म ारक, अखिल भारतीय अधिवक्ता परिषद शाखा सोलापूर, समरसता गतिविधि सोलापूर आणि विवेक विचार मंच सोलापूर यांच्यातर्फे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शुक्रवारी 'शोध बाबासाहेबांचा' या विषयावरील जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. शिवस्मारक सभागृहात ॲड क्षितीज गायकवाड यांनी सोलापूरकरांना मार्गदर्शन केले.

**ॲड. क्षितिज गायकवाड : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त व्याख्यान**

प्रारंभी भारतमातेच्या प्रतिमेचे आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण समिती सभापती संस्कृती सातपुते, अधिवक्ता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ॲड. धनंजय माने, शहर अध्यक्ष ॲड. महेश अग्रवाल, शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, विवेक विचार मंचच्या जिल्हा संयोजिका अश्विनी चव्हाण उपस्थित होत्या.



ॲड. क्षितिज गायकवाड म्हणा-ले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे हिंदू समाजातील हिरा होते. दुर्दैवाने त्यांचे महत्त्व हिंदू समाजाला कळाले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हिंदू विरोधी ठरवण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. मात्र त्यांची सत्य बाजू कधीही पुसली जाणार नाही. भार-तरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भगवान गौतम बुद्धांचा मार्ग सम ाजाला दाखविला तो भारतीयांच्या फायद्याचा आहे. प्रत्येकाच्या श्रद्धा आणि मतांचा आदर करत त्या श्रद्धेचे पालन करण्याचे स्वातंत्र्य देत संविधानाला मानणारा आदर्श नागरिक तयार करण्याची आपली भूमिका असली पाहिजे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत घडवण्यासाठी कटिबद्ध राहू**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांना अधिकार मिळाले. त्याबद्दल संपूर्ण देश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ऋणी आहे. हिंदू धर्माच्या काही परंपरांमध्ये सुधारणा करण्याचे महान काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यांच्या स्वप्नातील भारत घडवण्यासाठी आपण कटीबद्ध असले पाहिजे, असे सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते यांनी सांगितले.**

शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे, महिलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान देशभक्त होते, असेही ॲड. क्षितिज गायकवाड याप्रसंगी म्हणाले.

भारतीय संविधानातील उद्देश पत्रिकेचे वाचन ॲड. परमानंद जवळकोटे यांनी केले. अधिवक्ता परिषदेचे प्रांत संघटन सचिव ॲड. लक्ष्मीकांत गवई यांनी प्रास्ताविक केले. ॲड. वैशाली महिंद्रकर यांनी सूत्रसंचालन तर रंगनाथजी बंकापूर यांनी आभार प्रदर्शन केले.

याप्रसंगी अधिवक्ता परिषदेच्या प्रांत सदस्या ॲड. नीता मंकणी, विवेक विचार मंचाचे शहर संयोजक सिद्धांत बाबा बाबरे, जिल्हा सहसंयोजक ड. प्रशांत कांबळे, अधिवक्ता परिषदेचे सचिव ॲड. शांतिवीर महिंद्रकर, समरसता गतीविधीचे जिल्हा सहसंयोजक अंबादास खराडे आदी उपस्थित होते.

## स्वेरीत महात्मा फुले यांची १९९ वी जयंती साजरी

# महात्मा फुले यांनी सामाजिक चळवळीतून समाजाची सुधारणा केली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'समाजातील महिलांची प्रगती व्हावी यासाठी महात्मा जोतिराव फुले यांनी स्त्रीशिक्षणाची सुरवात घरापासून केली. त्यांनी प्रथम सावित्रीबाईंना शिक्षित केले. पुढे फुले दाम्पत्यांनी महिलांच्या शिक्षणासाठी पहिली शाळा भिडे वाड्यामधून सुरु केली. तेथून महिलांच्या शिक्षणासाठी अविरत कार्य चालू राहिले. महात्मा फुले यांनी सामाजिक चळवळीतून समाजसुधारणेसाठी अविरत कार्य केले त्यामुळे त्यांच्या विचारांनी आजही समाज उजळतो.' असे प्रतिपादन स्वेरीचे माजी विद्यार्थी, उद्य-ोजक व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य सुरज मस्के यांनी केले.

स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या



मार्गदर्शनाखाली गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटसंचलितकॉलेजऑफइंजिनिअरींग (ऑटोनॉमस) मध्ये थोर समाजसुधारक, स्त्री शिक्षणाचे प्रेरक आणि जनक महात्मा जोतिराव फुले यांच्या १९९ वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य सुरज मस्के हे मार्गदर्शन करत होते.

सुरवातीला सिनेट सदस्य सुरज मस्के यांच्या हस्ते महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महात्मा फुले यांचा जीवनपट उलगडून दाखवताना सुरज म स्के पुढे म्हणाले की, 'थोर समाजसुधारक म हात्मा फुले यांचे शिक्षण व सामाजिक क्षेत्रात अनमोल योगदान असून त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यातून सर्वांना स्फूर्ती मिळते. महाराष्ट्रातील एक सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, समाजसुधारक आणि लेखक म्हणून आपण महात्मा फ ुले यांच्याकडे पाहतो. सामाजिक प्रबोधन, अस्पृश्यता व जातीव्यवस्थेचे निर्मूलन तसेच स्त्रियांना व समाजातील मागास घटकांना शिक्षण देण्याचे महान कार्य त्यांनी अखंडपणे केले. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी आहे.' असे सांगितले.

यावेळी प्रतिक पाटील, सचिन शिंदे, वृषभ आळवेकर, प्रसाद लष्कर, संस्थेचे सचिव डॉ.सुरज रोंगे, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, संस्थेअंतर्गत असलेल्या बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम.जी.मणियार, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही. मांडवे, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, स्वेरी लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. पवित्रा बनकर, उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. एन.ए. तळवलकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

---

# भिमप्रकाश मागासवर्गीय बहुउद्देशिय सामाजिक संस्थेच्या जयंती उत्सव अध्यक्षपदी शिवा नाटिकर यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महात्मा बसवेश्वर म हाराज, क्रांतिसूर्य ज्यातिबा फुले, विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त भिमप्रकाश मागासवर्गीय बहुउद्देशिय सामाजिक संस्था अक्कलकोट च्या वतीने वार्षिक बैठकीचे आयोजन संस्थापक अध्यक्ष शिलामणी दादा_बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला यावेळी जयंती निमित्त विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे व मोठ्या उत्साहाने संयुक्त जयंती साजरा करण्याचे ठराव या बैठकीत घेण्यात आला

जयंती उत्सव समितीच्या नूतन अध्यक्षपदी शिवा नाटिकर उपाध्यक्ष- राम सोनकांबळे

सचिव- मनोज बनसोडे

खजिनदार- रतन इंगळे

पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली

या बैठकीला संस्थेचे मार्गदर्शक ज्योतिर्लिंग म ालक स्वामी सिद्धार्थ बनसोडे नितीन शिवशरण विजय भालेराव संदीप बाळशंकर पुष्पराज पप्पू मडीखांबे शिवा मडीखांबे भारत इंगळे आदी संस्थेचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

# केबल डक्ट प्रकरणात महापालिका, दिनेश इंजिनिअर्स व महाप्रीत यांचा सामूहिक भ्रष्टाचार : सुनील माने

## पुण्यातील नागरिकांची सुमारे २६ हजार कोटींची फसवणूक?; राष्ट्रवादीचे प्रवक्ते सुनील माने यांचा सवाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : जानेवारी २०२१ मधील पुणे महानगरपालिकेच्या तत्कालीन आयुक्तांनी खोदाई करून केबल टाकताना अतिरीक्त दोन डक्ट पुणे मनपासाठी टाकणे बंधनकारक केले होते. मात्र दिनेश इंजिनिअर्स या कंपनीने हे दोन अतिरिक्त केबल डक्ट न टाकल्यामुळे पुण्यातील नागरिकांची सुमारे २६ हजार कोटींची फसवणूक होत आहे. यात महापालिका प्रशासनातील अधिकारी, दिनेश इंजिनिअर्स व महाप्रित हे संगनमताने भ्रष्टाचार करत आहेतच. मात्र त्या सोबतच ओव्हरहेड केबल्सवर कारवाई करून स्थायी समिती अध्यक्ष ओव्हरहेड केबल्सचे पुरावे नष्ट करत आहेत का ? असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व प्रवक्ते सुनील माने यांनी केला. पुणे महानगरपालिकेत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



यावेळी बोलताना ते म्हणाले, जानेवारी २०२१ साली तत्कालीन महापालिका आयुक्तांनी खोदाई करून केबल टाकताना पुणे महानगरपलिकेसाठी अतिरीक्त २ केबल टाकणे बंधनकारक केले होते. त्याप्रमाणे, पथ विभागाने दिलेल्या खोदाई वर्क ऑर्डरनुसार दिनेश इंजिनिअर्स कंपनीने पुणे शहरामध्ये ४८ कि. मी. खोदाई करताना अतिरिक्त दोन डक्ट पुणे मनपासाठी टाकण्यात आले आहेत का ? याबाबतची माहिती मी माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार मागितली होती. माहिती अधिकाराअंतर्गत दिनेश इंजिनिअर्स कंपनीने टाकालेल्या दोन डक्ट बाबत, सदर डक्ट टाकले असल्याबाबत खात्री करून मालमत्ता व व्यवस्थापन विभागाने हस्तांतरीत करून घेतले आहेत का आणि तेच डक्ट त्याच कंपनीला भाड्याने का दिले याबाबतची माहिती मी डिसेंबर २०२५ पासून मागत आहे. मात्र मला माहिती न देता मालमत्ता व व्यवस्थापन विभाग पथ विभागाकडे आणि परत पथ विभाग मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडे टोलवा टोलवी करून माझी दिशाभुल करीत आहेत.

याबाबत मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडे अपील केल्यावर, सदर बाब ही पथ विभागाशी निगिडित आहे याबाबत कोणतेही अभिलेख उपलब्ध नाही. याबाबतची कार्यवाही पथ विभागाकडून झाली असावी असे उत्तर देण्यात आले. त्यासाठी मी पथ विभागाकडे २० मार्च २०२६ रोजी पुन्हा अर्ज केला असता माझा अर्ज आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे वर्ग करण्यात आला. अद्यापही मला दोन्ही विभागाकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. दरम्यान, माझ्या अपीलास उत्तर देताना मालमत्ता व व्यवस्थापन विभागाने सदर विषयाबाबत कोणतीही नोंद, ताबेयादी, करारनामा तसेच २ डक्ट भाड्याने देण्याची निविदा काढल्याबाबतची कागदपत्रे आढळून येत नाही. असे कळवले आहे.

याबाबत मी जी कागदपत्रे मिळविलेली आहेत त्यावरून असे निदर्शनास येत आहे की, पथ विभागाच्या २८ जानेवारी २०२१ च्या खोदाई वर्क ऑर्डर नुसार, दिनेश इंजिनिअर्स कंपनीकडून टाकण्यात येणा-या तीन डक्ट व्यतिरिक्त अतिरिक्त दोन डक्ट पुणे मनपाकरीता असे एकुण ५ डक्ट दिनेश इंजिनिअर्सने स्वखर्चाने टाकण्याचे आहे. असे २ डक्ट टाकले आहेत की नाही याबाबतची माहिती फोटो पुराव्यासह मला पुणे मनपाकडून दिली जात नाही. पथ विभागाकडून ०४ ऑगस्ट २०२२ रोजी निविदा प्रक्रिया करून जाहिरात प्रकाशित करण्यात आली. आणि पथ विभागाकडून त्याच दिवशी म्हणजे ०४ ऑगस्ट २०२२ रोजी पत्र देऊन अतिरिक्त दोन डक्टची सविस्तर माहिती देण्याचे निर्देश त्याच दिनेश इंजिनिअर्स कंपनीस देण्यात आले. पथ विभागाकडून डि.ई.पी. एल. कंपनीने टाकलेले २ डक्ट भाडे कराराने दिनेश इंजिनियर्स कंपनीस ३० वर्षाकरीता भाडयाने देण्यासाठी मसुदा करार तपासणी करीता विधी विभागाकडे पाठविण्यात आला.

महत्वाचे म्हणजे अतिरिक्त २ डक्ट भाडे कराराची रक्कम दिनेश इंजिनिअर्स कंपनीकडून मालमत्ता व व्यवस्थापन विभागाने घेतलेली आहे. डक्ट टाकल्याचे कोणतेही पुरावे संयुक्त पाहणी व तांत्रिक अहवाल, जागेवरचे फोटो पुणे महानगरपालिकेने मला दीलेले नाही. मुळातच दिनेश इंजिनिअर्स कंपनीने अतिरिक्त २ डक्ट टाकलेच नाहीत असा माझा आरोप आहे. त्यामुळेच अतिरिक्त २ डक्ट निविदा काढून त्या दिनेश इंजिनियर्स कंपनीस दिलेले आहेत.या न टाकलेल्या अतिरिक्त २ डक्ट निविदेचा आधार घेऊन दिनेश इंजिनिअर्स कंपनीने त्रिपक्षीय करारातून पुणे शहरातील नागरीकांची २६ हजार कोटींचे नुकसान केलेले आहे.

दिनेश इंजिनिअर्स कंपनी, पुणे महानगरपालिका आणि महाप्रित यांच्यातील त्रि- पक्षीय करारामुळे, बेकायदेशीर ओव्हरहेड केबलचा शुल्क व दंड बुडविण्याकरीता अथवा वाचवण्याकरीता नोटिसा बजावलेल्या केबल कंपन्यांनी, सदर दिनेश इंजिनिअर्स कंपनीने तडजोड करून सबलिज करार करून या बेकायदेशीर भुमिगत व ओव्हरहेड केबल टाकणाऱ्या कंपन्यांना (१८०० कोटी) शुल्क व दंड भरण्यापासून अभय मिळणार याबाबत मी आवाज उठवला आहे.

ओव्हरहेड केबल्स कारवाई करून स्थायी समिती अध्यक्षा ओव्हरहेड केबल्सचे पुरावे तरी नष्ट करीत आहेत किंवा दिनेश इंजिनिअर्स कंपनी व्यवसायात अडकलेली असल्यामुळे ओव्हरहेड केबल्सवर कारवाई करून व्यवसाय बंद पाडण्याची भीती दाखवून केबल कंपन्यांना ब्लॅकमेल करून ओव्हरहेड केबल दिनेश इंजिनियर्स कंपनी सोबत करार करून भुमिगत करण्यासाठी स्थायी समिती अध्यक्ष दिनेश इंजिनियर्स कंपनीस मदत करीत आहेत.

महाप्रितकडे निविदा काढून दिनेश इंजिनिअर्स कंपनीस देण्यात आलेल्या कामाबाबत देखील माहिती मागितलेली असून महाप्रितकडून मला अद्यापही कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. या दिनेश इंजिनिअर्स कंपनी आणि पुणे मनपाचे पथ, मालमत्ता व व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन विभाग यांची मिलीभगत तर होतीच त्यामध्ये आत्ता सरकार देखिल सामील झाले आहे. यातून पुणे मनपाचे हजारो कोटींचे आर्थिक नुकसान होणार आहे. या प्रकरणात एकत्रित भ्रष्टाचार होत आहे. महापालिका आणि महाप्रीत कागदपत्रांची लपवाछपवी करत आहे. हा भ्रष्टाचार त्यांना बाहेर येऊ द्यायचा नसल्याने त्यांनी कागदपत्रे न देण्याचे धोरण गेली अनेक महिने सुरू ठेवले आहे. मात्र न्यायालयात त्यांना ही कागदपत्रे द्यावीत लागतील, असे माने यांनी या पत्रकार परिषदेत सांगितले.

---

# अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे पुन्हा ॲक्शन मोडवर; घरगुती गॅसचा अवैध वापर करणाऱ्यांचे धाबे दणाणले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी एस. कीर्ती केमन यांच्या मार्गदर्शनाखाली आज गुरुवारी सायंकाळी अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या नेतृत्वास आसरा मैदान, सावरकर मैदान, येथील चौपाटी किल्ला बागेच्या बाजूस चायनीज गाड्या व पावभाजी सेंटरवर गाडी टाकण्यात आल्या यावेळी नऊ घरगुती वापराचे सिलेंडर व्यवसायिक ठिकाणी अवैधरित्या वरात परत असल्याचे दिसून आल्यानंतर पथका समक्ष जप्त करण्यात आले , रात्री उशिरापर्यंत फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याचे कामकाज चालू होते.

या पथकात परिमंडळ अधिकारी व विभाग राजेश यमपुरे परिमंडळ अधिकारी व विभाग नंदकिशोर डोके परिमंडळ अधिकारी विभाग प्रफुल्ल नाईक पुरवठा निरीक्षक ज्ञानेश्वर काशीद सज्जन भोसले गीता डके लिपिक वैभव गोरे सचिन लांडे आनंद मदने तसेच पोलीस प्रशासन व पोलीस अंमलदार जावेद जमादार आबाजी साबळे धीरज सातपुते विठ्ठल यलमार आदी उपस्थित होते.




---

# मोहा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती कमिटीच्या अध्यक्षपदी पॅन्थर अशोक कसबे यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोहा/प्रतिनिधी : प्रविण कसबे कळंब तालुक्यातील मोहा समाज मंदिर येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, क्रांतीसुर्य, प्रज्ञा सुर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बाबासाहेब कसबे,व तानाजी कसबे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.या बैठकीत अध्यक्षपदी अशोक आप्पा कसबे तर उपाध्यक्षपदी मिलिंद भगवान कसबे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच खजिनदार आकाश कसबे, अभिजित कसबे तर मिरवणूक प्रमुख शशिकांत, तात्या कसबे, गणेश कसबे, राहुल कसबे, दगडू कसबे, विशाल कसबे, शरद कसबे, विवेक कसबे, प्रमोद कसबे,अरविंद हिरवे, सौरभ ओव्हाळ, विनोद सावंत, शहाजी कसबे काका सोनवणे, शुभम कांबळे, नितीन कसबे, विजय कसबे, रोहित कसबे, निलेश ओव्हाळ, प्रशांत कसबे, महावीर कसबे, विशाल कसबे यांची देखावा प्रमुख म्हणून निवड करण्यात आली.या बैठकीस भिमसैनिकांची मोठी उपस्थिती होती.

